सकाळ पा. नं. १

# 'मविआ'च्या काळातच महत्त्वाचे प्रकल्प राज्याबाहेर!

## उपमुख्यमंत्री फडणवीसांचा घणाघात

**सकाळ न्यूज नेटवर्क**

मुंबई, ता. ३१ : 'महाविकास आघाडीच्या काळातच महत्त्वाच्या उद्योगांनी राज्यातून काढता पाय घेतला; पण त्यावरून आता आमच्यावरच टीका केली जात आहे,' असा घणाघात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकार परिषदेत बोलताना विरोधकांवर केला. गेलेल्या प्रकल्पांचे कारण पुढे करून राज्यातील गुंतवणूक रोखण्याचा महाविकास आघाडीचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले. 'नाणार'च्या प्रकल्पाला कोणी विरोध केला? असा प्रश्नही त्यांनी केला.

फडणवीस म्हणाले की, 'राज्यात 'मविआ'चे सरकार सत्तेत असताना फॉक्सकॉन येथे उद्योग उभारणार नाही, असे तत्कालीन उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी स्पष्ट केले होते. टाटा-एअरबस प्रकल्पाविषयी आमचे सरकार असताना ज्या हालचाली सुरू झाल्या त्याबाबत विपरीत घडते आहे, असे कानावर आले. मी विरोधी पक्ष नेता होतो तरी या प्रकल्पाशी संबंधित अधिकाऱ्यांना भेटलो. महाराष्ट्रातून बाहेर पडू नका, अशी विनंती त्यांना केली. त्यावर त्या अधिकाऱ्याने राज्यातील वातावरण गुंतवणूक करण्यायोग्य नाही, असे मला सांगितले. आम्ही बाहेर चाललो आहोत हे



पान ७ वर

### » रिफायनरी राज्यातच होणार

महाराष्ट्रातून गुंतवणुकीचा बाप असलेल्या रिफायनरीला विरोध का केला गेला? असा प्रश्न फडणवीसांनी विरोधकांना केला. 'नाणार' आपल्याच मुख्यमंत्रिपदाच्या काळात गुंडाळला गेला, हे लक्षात आणून देताच ते म्हणाले, 'माझे तेव्हाचे ट्विट स्पष्ट होते, की रिफायनरी 'नाणार'ला होणार नाही; मात्र रिफायनरी महाराष्ट्रातच होईल, बारसू की कुठे ते कालांतराने स्पष्ट होईलच, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प राज्याबाहेर जाणे योग्य नाही. आपल्या राज्यातील प्रत्येक प्रकल्प हा गुजरातलाच कसा जातोय? हे चुकीचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्व राज्यांना समान वागणूक द्यायला हवी.

- **राज ठाकरे**, अध्यक्ष, मनसे

महाराष्ट्र टाईम्स पा. नं. ५

# 'आकड्यांचे खेळ आम्ही करू शकत नाही'

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

'वेदांत-फॉक्सकॉन, बल्क ड्रग पार्क आणि टाटा एअर प्रकल्प राज्यातून बाहेर गेल्यानंतर यापेक्षा मोठा उद्योग राज्याला मिळेल, असे आश्वासन देण्यात आले होते. पण, आकड्यांमध्ये आम्ही खेळ करू शकत नाही. कदाचित त्यामुळे आमचे सरकार पडले असेल. आकडे दुसऱ्याचे घेऊन आपले कसे दाखवायचे आणि घटनाबाह्य सरकार कसे तयार करायचे. यामध्ये काही लोक माहीर आणि जादूगार असतात. त्यांनी पुन्हा एकदा आकड्यांचा खेळ केला आहे,' असा टोला युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी शिंदे-फडणवीस सरकारला सोमवारी लगावला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्योग गुंतवणुकीवर समोरासमोर चर्चेला यावे, असे खुले आव्हानही त्यांनी दिले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत केलेल्या आरोपांवर आदित्य ठाकरे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. 'उपमुख्यमंत्र्यांनी देशात अनेक राज्यांमध्ये स्पर्धा वाढली आहे, असे म्हटले आहे. पण महाराष्ट्र कुठे कमी पडतोय का? याबाबत चर्चा करण्यासाठी मी त्यांना आव्हान देतो,' असे आदित्य म्हणाले. 'टाटाच्या ज्या उच्च अधिकाऱ्याने महाराष्ट्रात वातावरण योग्य नाही सांगितले त्याचे नाव सांगावे. दादागिरी सत्ताधारी पक्षाकडूनच चालते, आमच्याकडून कोणालाही धोका नाही. या अधिकाऱ्याने महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकार असताना उद्योगासाठी चांगले वातावरण नव्हते, असे सांगितले, हे त्यांनी जाहीर करावे. कारण आम्हाला केंद्र सरकार सांगेल, तिथे जावे लागेल, असे सांगण्यात आले होते,' असा खुलासा आदित्य यांनी 'टाटा-एअरबस' प्रकल्पासंबंधी बोलताना केला.

## आदित्य ठाकरे यांचा फडणवीसांना टोला



'फडणवीस यांनी उल्लेख केलेला प्रकल्प जानेवारी २०२०मध्ये महाराष्ट्रातून बाहेर गेला आहे. हा प्रकल्प २०१६मध्ये देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' योजनेतून महाराष्ट्रात आला होता. ही फॉक्सकॉनची कंपनी असून महाराष्ट्रात मोबाइल निर्मिती करणार होती. पुढे हा प्रकल्प अमेरिकेत गेला. हा प्रकल्प जरी फॉक्सकॉन कंपनीचा असला, तरी यामध्ये आणि वेदान्त फॉक्सकॉन प्रकल्पामध्ये जमीन आस्मानाचा फरक आहे. वेदान्त फॉक्सकॉनचा प्रकल्प 'सेमीकंडक्टर चिप'साठी होता. फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत उल्लेख केलेला प्रकल्प 'मोबाइल' फोनसाठी होता. त्यामुळे कृपा करून महाराष्ट्राला दिशाभूल करण्याचे, महाराष्ट्राला बदनाम करण्याचा प्रयत्न सोडून द्या, अशी विनंती फडणवीस यांना आहे,' असे ते म्हणाले.

# 'प्रकल्प गुजरातला जाणे वाईट'

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

'पंतप्रधान हे देशाचे हवेत. त्यांना प्रत्येक राज्य हे मुलांसारखे समान असले पाहिजे. महाराष्ट्रातील हा प्रकल्प आसामला गेला असता, तर वाईट नसते वाटले. पण वाईट याचे वाटते की, जो प्रकल्प येतो, तो गुजरातला जातो. पंतप्रधानांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे,' असे मत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोमवारी मुंबईत मांडले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या अंगीकृत संघटनांची विशेष बैठक वांद्रे येथील एमआयजी क्लब येथे पार पडली. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. यावेळी राज यांनी गुजरातमध्ये प्रकल्प गेले असले, तरी महाराष्ट्र राज्यच देशात अग्रेसर असल्याचे नमूद केले. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षात जोरदार काम सुरू आहे. येत्या काळात पक्षाचे विविध स्तरांवर मेळावे होणार आहेत, असे त्यांनी यावेळी जाहीर केले. 'प्रत्येक राज्य मोठे झाले पाहिजे. प्रत्येक राज्यात उद्योग आले पाहिजेत. तिथल्या लोकांना घर सोडून बाहेर जाण्याची, अन्य राज्यांवर ओझे होण्याची गरज नाही. असे प्रकल्प राज्याराज्यांत गेले, तर देशाचाच विकास होईल. महाराष्ट्र हे राज्य आजही उद्योगधंद्यांच्या बाबतीत इतर कोणत्याही राज्यांपेक्षा पुढे आहे,' असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

'राज्यातील राजकारण खालच्या पातळीवर गेले आहे. राजकीय नेत्यांची भाषा खालावली आहे आणि हे खेदजनक आहे. अशी भाषा महाराष्ट्राच्या राजकारणात मी या आधी कधीच ऐकली नाही,' अशी खंत राज ठाकरे यांनी व्यक्त केली.

सकाळ पा. नं. 2

# विरारमध्ये राष्ट्रीय दौडमधून एकात्मतेचा संदेश

## वसई-विरार महानगरपालिकेतर्फे सरदार वल्लभभाई पटेल जयंती उत्साहात

विरार, ता. ३१ (बातमीदार) : सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती तसेच केंद्र शासनाच्या सूचनेनुसार स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून सोमवारी (ता. ३१) सकाळी ७ वाजता नवीन विवा महाविद्यालय, विरार पश्चिम येथे वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत एकता दौडचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाद्वारे राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला.



विरार : एकता दौडमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी.

कार्यक्रमांतर्गत सकाळी ७.१५ वाजता उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झेंडा दाखवून एकता दौड स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेत ४०० हून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. यामध्ये कुवेत येथे नुकत्याच झालेल्या चौथ्या आशियाई युवा ॲथलेटिक्स स्पर्धेत मुलींच्या १८ वर्षांखालील वयोगटात ४०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात रौप्यपदक व मेडल रिले या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक जिंकणाऱ्या ईशा जाधव हिनेही सदर कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवला.

एकता दौड स्पर्धेच्या समाप्तीनंतर सर्व उपस्थितांनी राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेतली. या वेळी अतिरिक्त आयुक्त अजिंक्य बगाडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अरुण कोल्हे, उपआयुक्त पंकज पाटील, शंकर खंदारे, सर्व सहायक आयुक्त, महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक, नागरिक, पदाधिकारी, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्तांच्या हस्ते महानगरपालिका मुख्यालय विरार (पूर्व) येथे स्पर्धेत विजयी झालेल्या स्पर्धकांचा स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच ईशा जाधव आणि तिचे प्रशिक्षक यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

सकाळ पा. नं. 2

# वर्तक विद्यालयातर्फे राष्ट्रीय एकता धाव

विरार, ता. ३१ (बातमीदार) : अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाच्या रासेयो विभागातर्फे राष्ट्रीय एकता धावचे आयोजन करण्यात आले होते. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे एकता दिन साजरा करण्यात आला.

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल व भारतरत्न इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक व इतर विद्यार्थी यांनी राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली. प्रा. सुरेश सुर्वे यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या योगदानाची माहिती दिली. यानंतर वर्तक महाविद्यालय ते अंबाडी चौक व पुन्हा वर्तक महाविद्यालय या मार्गावर एकता धाव घेण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार शेळके व उपप्राचार्या डॉ. जानकी सावगाव यांचे मार्गदर्शन लाभले.

रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. शत्रुघ्न फड व प्रा. आदिती यादव यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी ग्रामीण विकास विषयाचे शिक्षक प्रा. किरण पांचाळ व प्रा. ज्योती ठाणकर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक व सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. आदिती यादव यांनी केले.

सकाळ पा. नं. ३

# मीरा-भाईंदर शहराचा पाणीपुरवठा राहणार बंद

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा. रोड : मीरा-भाईंदर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या 'स्टेम'ने पाणीपुरवठा योजनेअंतर्गत देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेतल्याने 'स्टेम'कडून होणारा पाणीपुरवठा २ नोव्हेंबरला सकाळी ९ पासून ३ नोव्हेंबरला सकाळी ९ वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे.

एमआयडीसीकडून होणारा पुरवठा सुरू राहणार असला तरीही 'स्टेम'चा पाणीपुरवठा पूर्ववत होईपर्यंत पाणीपुरवठा कमी दाबाने व उशिराने होईल, असे पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता शरद नानेगावकर यांनी सांगितले.

लोकमत पा. नं. १

## वसईत 'दीपसंध्या'ने रसिक मंत्रमुग्ध

विरार (बातमीदार) : वसई-विरार शहर महापालिका आणि डॉ. धोंडो गोविंद अभ्यंकर स्मृती वाचनालयातर्फे पारनाका येथील शेषवंशी क्षत्रिय भंडारी समाजाचे अनंतराव ठाकूर नाट्यगृहात दीपसंध्या या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. माजी आमदार डॉमनिक घोन्सालवीस, माजी महापौर प्रवीण शेट्टी, फा. स्टीफन घोन्सालवीस, गायक कलाकार अजित परब व निवेदक विघ्नेश जोशी यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनानंतर अजित परब यांच्या 'सूर निरागस हो' या गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. गायक अजित परब, राधिका नांदे, जय आजगावकर, निरुपमा डे यांसह चिमुकली लिटल चॅम्प स्वरा जोशी यांनी भक्तिगीते, भावगीते, हिंदी चित्रपट गीते, लावणी, गोंधळ अशी गाणी सादर करत कार्यक्रमात रंगत आणली. या कार्यक्रमासाठी वसईतील अनेक माजी लोकप्रतिनिधी, महापालिका अधिकाऱ्यांसह वसईतील मान्यवर रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रकाश वनमाळी यांनी सर्वांचे आभार मानताना प्रशासकीय काळात प्रत्येक सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमांच्या आयोजनासाठी भक्कम पाठिंबा देणारे ववशि महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांचे आभार मानले. तसेच या सर्व उपक्रमांचे प्रेरणास्थान आमदार हितेंद्र ठाकूर यांना धन्यवाद दिले.



लोकमत पा. नं. १

## न्यायालयासाठी वकिलांची निदर्शने

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा - भाईंदरसाठी न्यायालयाची इमारत बांधून तयार आहे. मात्र, काही कामे रखडल्याने न्यायालय सुरू होण्यास विलंब होत आहे. हे न्यायालय सुरू कधी होणार, याची तारीख सांगा, अशी मागणी करत रविवारी मीरा भाईंदर ॲडव्होकेट वेल्फेअर असोसिएशन वकिलांनी न्यायालयाच्या इमारतीबाहेर निदर्शने केली. संघटनेच्या वतीने पोलिसांना निवेदन देण्यात आले. अध्यक्ष ॲड. एच. आर. शर्मा, सचिव अन्वर सऊद, खजिनदार ॲड. धर्मेंद्र पटेल, उपाध्यक्ष ॲड. विरेंद्र जालान व ॲड. डी. के. जैन, ॲड. विरेंद्र चौरसिया, ॲड. अलका कुरेशी, ॲड. सादिक खान, भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. रवी व्यास आंदोलनात सहभागी झाले होते.

सामना पा. नं. ६

## वसईत एकच फ्लॅट दोन ग्राहकांना विकला

वसई, दि. ३१ (सा. वा.) - दोन फ्लॅट परस्पर दुसऱ्याला विकल्याचा कारनामा बिल्डरने केला आहे. याप्रकरणी फसवणूक झालेल्या ग्राहकाने केलेल्या तक्रारीवरून बिल्डरविरोधात वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दहिसर येथे राहणारे संजय तिवारी यांना क्रीतिका बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्सचे मालक अमित पांडे यांनी १० लाखांत दोन फ्लॅट देतो, असे सांगून पैसे उकळले. त्यानंतर बिल्डरने हे दोन्ही फ्लॅट दुसऱ्याला परस्पर विकले. याचा वालीव पोलीस अधिक तपास करीत आहे.

लोकमत पा. नं. ४

## माजी नगरसेविकेला सव्वापाच कोटींना गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : माजी नगरसेविका आणि त्यांच्या कुटुंबाला व्यावसायिक गाळ्यांच्या बदल्यात निवासी गाळे देऊन सव्वापाच कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी भाईंदरच्या नवघर पोलिसांनी चार विकासकांसह कंपनीवर गुन्हा दाखल केला आहे. सव्वापाच कोटींपैकी तब्बल तीन कोटी ११ लाख इतकी रक्कम त्यावेळी नगरसेविका व कुटुंबीयांनी विकासकास रोखीने दिली होती.

२०१२ ते ऑगस्ट २०१७ दरम्यान मीरा-भाईंदर महापालिकेत सुनीला शर्मा या नगरसेविका होत्या. त्यांच्यासह पती सतेंद्र शर्मा व मुलगा नरेश शर्मा हे स्वामी आत्मानंद ट्रस्टमध्ये ट्रस्टी आहेत. त्या नगरसेविका असताना त्यांच्या ट्रस्टला शाळेसाठी भाईंदर पूर्वेत तीन गाळ्यांची आवश्यकता होती. 'सी ९ बिल्डकॉन'चे विकासक मुर्तुझा मदारवाला यांनी भाईंदर पूर्वेत 'सिल्व्हर' लाइन' इमारतीत वाणिज्य गाळे असल्याचे सांगितले. त्यानुसार ऑक्टोबर २०१६ मध्ये दोन गाळ्यांचे, तर जून २०१७ मध्ये एका गाळ्याच्या खरेदीचा नोंदणीकृत करारनामा केला.

### विकासकांवर गुन्हा

१ मुर्तुझा व त्यांच्या भागीदारांनी त्यातील नकाशात १०१, २०१ व २०२ हे तिन्ही गाळे व्यावसायिक वापरासाठी असल्याचे दर्शविले होते. त्यासाठी पाच कोटी २४ लाख ९१ हजार रुपये मोजून ते खरेदी केले. त्यापैकी तीन कोटी ११ लाख रुपये रोखीने दिले होते.

२ रोखीच्या व्यवहारांची नोंद साध्या मुद्रांक पेपरवर नमूद केली. मात्र, प्रत्यक्ष निवासी गाळे देऊन त्यांची फसवणूक करण्यात आली.

३ सुनीला यांच्या तक्रारीवरून मुर्तुझासह देवांग मेहता, अँथोनी परेरा, हर्षिल दोषी या भागीदारांसह कंपनीवर २८ ऑक्टोबरला नवघर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

सामना पा. नं. ८

## दुकान फोडले

विरार : नालासोपारा येथील रहिवासी मनोज सिंग यांच्या मालकीचे महादेवनगरमध्ये किराणा मालाचे दुकान आहे. चोरट्यांनी दुकानाचा पत्रा उचकटून आत प्रवेश केला. दुकानातील ४९ हजार ४३० रुपयांचे किराणा सामान घेऊन चोरट्यांनी पळ काढला. याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सामना पा. नं. ८

## मुलाचे अपहरण

नालासोपारा : १७ वर्षीय अल्पवयीन मुलाचे अपहरण करण्यात आल्याची घटना नालासोपाऱ्यात घडली आहे. बाकणपाडा येथे राहणारा सदर अल्पवयीन मुलगा बाहेर जातो असे सांगून घराबाहेर गेला. त्यानंतर तो परत आलाच नाही. त्याच्या नातेवाईकांनी शोध घेऊनही तो कुठेच सापडला नाही. त्याच्या आईच्या तक्रारीवरून पेल्हार पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

पुण्य नगरी पा. नं. १



## भारत जोडो यात्रेनिमित्त मीरा-भाईंदरमध्ये काँग्रेसची रॅली

। मीरा रोड : राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत सुरू असलेल्या भारत जोडो यात्रेला देशभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून तेलंगणामधून ७ नोव्हेंबर रोजी ही यात्रा महाराष्ट्रात येत असून देगलूर, नांदेड येथे प्रवेश करणार आहे. या निमित्ताने माजी आमदार मुझफ्फर हुसैन यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांच्या नेतृत्वाखाली मीरा-भाईंदर जिल्हा काँग्रेसच्या वतीने उत्तन ते डेल्टा गार्डन, मीरा रोड अशा भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये माजी उपमहापौर सय्यद नूरजहाँ हुसैन यांच्यासह पक्षाचे नगरसेवक, जिल्हा, सेल, ब्लॉकचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मीरा-भाईंदरमधून पक्षाचे नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते भारत जोडो यात्रेत सहभागी होणार असून पहिली तुकडी रेल्वेने नांदेडला रवाना होणार असल्याचे काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते प्रकाश नागणे यांनी सांगितले.

पुण्य नगरी पा. नं. १

# पॉस मशीन बंद पडत असल्याने ग्राहकांचे शिधावाटप दुकानांवर हाल

**। वसई :** वसई तालुक्यात शिधावाटप दुकानांना मागणी पेक्षा कमी धान्य मिळत असून वारंवार बंद पडणारे मशीन लोकांची आणि दुकानदारांची डोकेदुखी बनली आहे. त्यात शासनाने जिल्हा पुरवठा विभागात १०० टक्के मागणी असताना कधी ६० टक्के कधी ७० टक्के माल येत असल्याने वितरण व्यवस्था कोलमडली जात आहे. जर शासनाच्या पुरवठादाराकडून धान्य आलेच नाही तर पुरवठा अधिकारी पुरवठा कसा करणार? म्हणजेच आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार, अशी अवस्था झाली आहे.

वसई, विरार, नालासोपारामध्ये शिधावाटप दुकानांत पॉस मशीन सतत बंद पडत असल्याने दुकानांवर भल्या मोठ्या रांगा लागत आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून धान्य दुकानांत एकाच वेळी धान्य येत नसल्याने दोन वेळा रांगा लावाव्या लागत आहेत. कामावर जायचे की दुकानात जायचे आणि दुकानात गेल्यावर पॉस मशीन वारंवार बंद पडत असल्याने नागरिकांनी रोष व्यक्त केला आहे. पूर्वी प्रमाणे पावती पद्धतीने धान्य देण्यात यावे, अशी मागणी संदेश जगताप यांनी केली आहे. दुकानात धान्य घेण्यासाठी उन्हातान्हात रांगा लावाव्यात लागत आहेत, त्यामुळे एखाद्याचा तीव्र उन्हामुळे आरोग्याचा प्रश्न



निर्माण झाल्यास जबाबदार कोण? असा सवाल शोभा कुडाळकर यांनी उपस्थित केला आहे. वसई तालुक्यात अन्नधान्य पुरवठा वसईच्या गोदामातून केला जात होता, तेव्हा येथील पुरवठा अधिकारी सर्व दुकानांना व्यवस्थित मालाची पाहणी करून देत होते. मात्र अलीकडच्या काळात जेव्हापासून बोरिवली येथून धान्यपुरवठा केला जातो, तेव्हापासून वितरण व्यवस्थेचा बट्ट्याबोळ झाला आहे. बोरिवलीवरून एनएफएस ए आणि पीएमजीकेए वाय या योजनेचे धान्य दुकानात पाठवले जाते. मात्र ते धान्य वेळेत दिले जात नाही, अनेक दुकानांना महिना संपला तरी धान्य मिळत नाही, अशी काही दुकाने आहेत की, सप्टेंबरचे धान्य ऑक्टोबरमध्ये भेटते. तसेच मशीनचा गोंधळ आणि धान्य वेळेत न मिळल्याने होणाऱ्या नागरिकांच्या त्रासाला जबाबदार कोण? असा सवाल नागरिक विचारत आहेत. दरम्यान, जिल्हा पुरवठा अधिकारी पोपट ओमासे यांनी सांगितले की, वसई तालुक्यात १,३६,३१४, लाभार्थी आहेत, त्यापैकी साखर ५३,९२४; रवा १,२५,२५०; डाळ ५८,९९०; तेल १,१७,२९० इतके उपलब्ध झाले असून ३१ ऑक्टोबर २०२२ ला सायंकाळी ६ वाजेपर्यंत ७८ टक्के लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा देण्यात आला आहे. शासन स्तरावरील पुरवठादारांकडून केल्या जाणाऱ्या धान्यपुरवठ्यानुसार जिल्ह्यातील लाभार्थ्यांना वाटप केले जाणार आहे. तसेच उचल करण्यासाठी ८ तारखेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून सर्वांना धान्य दिले जाणार असल्याचे ओमासे यांनी सांगितले.

पुण्य नगरी पा. नं. ४

# महापालिकेने स्वत:च्या इंग्रजी शाळा सुरू कराव्यात - आ. सरनाईक

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदरच्या मुलांना दर्जेदार आधुनिक पद्धतीचे शिक्षण , स्वस्त व परवडणारे शिक्षण मिळावे यासाठी मीरा-भाईंदर महापालिकेने सीबीएससी व आयसीएससी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याची मागणी आमदार प्रताप सरनाईक यांनी आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे केली आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेच्या सध्या काही शाळा सुरू असल्या तरी मुंबई महापालिका , दिल्ली एज्युकेशन मॉडेल डोळ्यासमोर ठेवून मीरा-भाईंदरमध्ये शाळांचा दर्जा सुधारण्याची आवश्यकता आहे. महापालिका विकास प्रकल्पांवर कोट्यवधींचा खर्च करते. त्याचबरोबर शहरातील विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे हे आपले कर्तव्य आहे. त्यामुळे या नव्या इंग्रजी शाळा सुरू करण्याचे



आपण लवकर ठरवावे. 'कन्स्ट्रक्शन टीडीआर'च्या माध्यमातून ज्या इमारती मीरा-भाईंदर महापालिकेकडे हस्तांतरित होतील, त्या इमारतीमध्ये महापालिकेच्या माध्यमातून या इंग्रजी शाळा सुरू केल्या जाऊ शकतात. यासाठी महापालिकेने जलदगतीने प्रयत्न करावेत. बहुतांश खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळा पालकांकडून जादा फी घेऊन लुटमार करत आहेत. यावर नियंत्रण यावे म्हणून उपाययोजना करतानाच महापालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा असणे आवश्यक आहे. कोरोना काळात पालकांना फीसाठी तगादा लावून कसा त्रास झाला आहे. अनेक शिक्षण सम्राटांचे शाळा हे उत्पन्नाचे केंद्र झाले आहे. त्यामुळे आता मीरा-भाईंदर महापालिकेने मुंबई महापालिकेप्रमाणेच नव्या सीबीएससी व आयसीएससी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्याच पाहिजेत.

ज्या पालकांना आपल्या मुलांना इंग्रजी शाळांमध्ये घालायचे असेल, त्यांना यामुळे एक पर्याय मिळेल. हे काम करण्यासाठी मुंबई मनपा व दिल्लीमधील शाळांचे आपण उदाहरण डोळ्यासमोर ठेवू शकतो. यामुळे महापालिकेच्या शाळांची पटसंख्या वाढेल व पालिका काळाप्रमाणे चांगले शिक्षण देत आहे याबद्दल नागरिकही समाधान व्यक्त करतील. महापालिकेने आपल्या शाळांमध्ये शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी शाळेच्या पायाभूत सुविधांमध्ये बदल, शिक्षक आणि मुख्याध्यापकांची क्षमता वाढवणे, शाळा प्रशासनाला जबाबदार बनवणे यासह अनेक नव्या गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. या शिक्षण व्यवस्थेतील सुधारणेसाठी महापालिकेने आपला निधी खर्च करावाच, पण त्याचबरोबर राज्य सरकारचेही आवश्यक ते सहकार्य मिळेल.

प्रत्येक ठिकाणी महापालिकेने उत्पन्न किंवा फायदा - तोटा पाहू नये. शहरातील गरीब-गरजू , सर्वसामान्य घरातील नागरिकांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून या नव्या शाळा व त्याच बरोबर इतर सर्व शैक्षणिक सुविधा महापालिका शाळांमध्ये निर्माण करण्यासाठी महापालिकेने प्रयत्न करणे आवश्यक आहे. महापालिकेने आपले नवे शैक्षणिक धोरण ठरवावे आणि त्याची अंमलबजावणी सुरू करावी, अशी मागणी आमदार सरनाईक यांनी आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे केली आहे.

पुढारी पा. नं. ५

# सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त एकता साखळी



**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात सोमवारी थोर स्वातंत्र्यसेनानी सरदार वल्लभभाई पटेल यांची १४७ वी जयंती साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनासह मानवी एकता साखळीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयुक्त दिलीप ढोले यांनी ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर दरम्यान भ्रष्टाचारविरोधी दक्षता जनजागृती सप्ताह पाळण्याचे आवाहन केले.

पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय एकतेची शपथ घेण्यात आली. यावेळी आयुक्तांनी राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर या कालावधीत भ्रष्टाचारविरोधी दक्षता जनजागृती सप्ताह जाहिर करण्यात आल्याचे सांगितले. याची अंमलबजावणी पालिका कार्यक्षेत्रात देखील करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भ्रष्टाचाराविरोधात लढा देण्यासाठी सर्व विभागप्रमुख, खातेप्रमुख व कर्मचाऱ्यांना त्यांच्या उपस्थितीत प्रतिज्ञा घेण्यात आली. यानंतर पालिका मुख्यालयापासून अंदाजे एक ते दीड किलोमीटरपर्यंत मानवी एकता साखळी तयार करून नागरीकांमध्ये राष्ट्रीय एकताबाबत जनजागृती करण्यात आली. यात सर्व अधिकारी, कर्मचारी व कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

लोकसत्ता पा. नं. १

# वसईत 'आनंदाचा शिधा' अपुराच

## पूर्ण वस्तूंचे वाटप नाही

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** दिवाळीनिमित्त शासनाने जाहीर केलेला आनंदाचा शिधा दिवाळी सरली तरीही वसईत अजूनही अपुराच आहे. त्यामुळे अजूनही अनेक शिधापत्रिका धारकांना अवघ्या शंभर रुपयांचे धान्याचे संच पूर्ण मिळाले नाहीत.

शासनाने गोरगरीब नागरिकांची दिवाळी गोड व्हावी यासाठी आनंदाचा शिधा संच जाहीर केला होता. या संचात चणाडाळ, रवा, साखर, पामतेल प्रत्येकी एक किलो स्वरूपात या वस्तू अवघ्या शंभर रुपयांत देण्याचे जाहीर करण्यात आले होते. वसईमध्ये १ लाख ३६ हजार ३१४ शिधापत्रिका धारकांना याचा लाभ दिला जाणार होता. मात्र दिवाळी संचासाठीचा शिधा हा अपुऱ्या प्रमाणात आल्याने अजूनही अनेक शिधापत्रिका धारकांना याचा लाभ मिळाला नसल्याचे चित्र वसईत दिसून येत आहे.

### दिवाळी शिधा जिन्नस साठा

(१ लाख ३६ हजार ३१४ लाभार्थी)

| | प्राप्त शिधा (किलो) | अप्राप्त शिधा (किलो) |
|---|---|---|
| रवा | १२५२५० | ११०६४ |
| साखर - | ५३९२४ | ८२३९० |
| चणाडाळ- | ६८९९० | ६७३२४ |
| पामतेल - | १०८३०५ | २८००९ |

"आनंदाचा शिधा यामध्ये जितका जिन्नस साठा उपलब्ध झाला होता. त्याचे रास्त भाव दुकानातून वितरण करण्यात आले आहे. ज्याप्रमाणे साठा येत आहे त्यानुसार पुरवठा विभागाकडून वितरण सुरूच आहे. - **रोशन कापसे**, पुरवठा अधिकारी वसई.

वसईत आतापर्यंत १ लाख २५ हजार २५० किलो रवा, ५३ हजार ९२४ किलो साखर, ६८ हजार ९९० किलो चणाडाळ, १ लाख ८ हजार ३०५ किलो पामतेल असा साठा मिळाला आहे. तर अजूनही ११ हजार ६४ किलो रवा, ८२ हजार ३९० किलो साखर, ६७ हजार ३२४ किलो चणाडाळ, २८ हजार ९ किलो पामतेल इतके शिधा जिन्नस साठा उपलब्ध झाला नाही. विशेषतः साखरेचा साठा मोठ्या प्रमाणात अपुरा असल्याचे समोर आले आहे.


त्यामुळे शिधापत्रिका धारकांनाही एक दोन अशा स्वरूपात वस्तू देण्यात आल्याचे शिधापत्रिका धारकांनी सांगितले आहे. दिवाळी सरली तरीही अजूनही आवश्यक त्या प्रमाणात शिधा उपलब्ध न झाल्याने सर्वसामान्य नागरिकांनी शासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शासनाने घोषणा करूनही त्याची योग्य ती अंमलबजावणी होत नसल्याने एक प्रकारे गोरगरीब नागरिकांच्या भावनिकतेशी खेळ केला जात असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.

लोकसत्ता पा. नं. १

# समुद्र किनाऱ्यावरील पर्यटकांच्या हुल्लडबाजीला चाप

## पोलिसांकडून कारवाईला सुरुवात

**लोकसत्ता वार्ताहर**



**वसई :** समुद्रकिनारी चारचाकी वाहने घेऊन हुल्लडबाजी करणे निष्काळजीपणे वाहने चालविणे अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी पोलिसांनी आता कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. नुकताच भुईगाव समुद्रकिनारी समुद्रात अडकून पडलेल्या गाडी मालकाच्या विरोधात वसई पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

वसई पश्चिमेतील परिसरात विस्तीर्ण असे समुद्रकिनारे आहेत, तसेच आजूबाजूचा परिसर हा निसर्गरम्य असल्याने वसई विरार शहर पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. अर्नाळा, नवापूर, भुईगाव, राजोडी, सुरुची, कळंब, रानगाव आदी समुद्रकिनारे पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी मौज मज्जा करण्यासाठी या किनाऱ्यावर मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात.

परंतु काही समुद्रकिनाऱ्यावर येणाऱ्या काही पर्यटकांमार्फत मद्यपान करून हुल्लडबाजी केली जात असते. या हुल्लडबाजीमुळे याचा फटका या ठिकाणी मौजमजा करणाऱ्या पर्यटकांना बसत असतो. तर काही पर्यटक हे थेट वाहने घेऊन समुद्रकिनाऱ्यावर जात असतात. तर काही जण स्टंटबाजीसुद्धा करीत असतात, अशा प्रकारामुळे गाड्या समुद्रात अडकून पडल्याच्या व किनाऱ्यावर अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत. नुकताच २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी भुईगाव समुद्रात चारचाकी वाहन अडकून पडले होते. भरतीच्या पाण्यामुळे ते वाहन जास्त आत खेचले गेले होते. त्यामुळे ते वाहन बाहेर काढण्यास ही अडचणी निर्माण होत होत्या. दुसऱ्या दिवशी रात्री आठ वाजता जेसीबीच्या साहाय्याने हे वाहन पोलीस व स्थानिक नागरिक यांच्या मदतीने बाहेर काढण्यात आले. चालकाने दाखविलेल्या निष्काळजीपणामुळे हा प्रकार घडला असल्याने वसई पोलिसांनी चालकाच्या विरोधात वसई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक ऋषिकेश पवळ यांनी दिली आहे. अशा प्रकारे वाहने समुद्रकिनारी घेऊन जाऊन स्वतःचा व इतर पर्यटकांचा जीव धोक्यात घालत आहेत. अशा प्रकाराला आळा घालावा यासाठी आता थेट कारवाईला सुरुवात करण्यात आल्याचे पवळ यांनी सांगितले आहे.

> **“भुईगाव समुद्रकिनारी पर्यटकांनी गाडी नेल्याने थेट ती आत ओढली गेली होती. शर्थीचे प्रयत्न करून गाडी बाहेर काढण्यात आली. असे प्रकार समुद्रकिनारी सातत्याने होत असतात. त्यामुळे जे वाहनचालक हुल्लडबाजी करीत आपली वाहने समुद्रकिनारी नेत आहेत. त्यांच्याविरोधात कारवाई केली जाणार आहे.**
>
> -**ऋषिकेश पवळ**, पोलीस निरीक्षक वसई पोलीस ठाणे

लोकसत्ता पा. नं. १

# सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या खांबांवर अनधिकृत नेटवर्क 'बूस्टर'

## महानगरपालिकेकडून नेटवर्क कंपनीचा गैरप्रकार उघडकीस

**लोकसत्ता वार्ताहर**

**"शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर आधुनिक पद्धतीचे नेटवर्क बूस्टर लावण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे याविरोधात कायदेशीर प्रक्रिया राबवली जात असून लवकरच कठोर कारवाई केली जाईल. - संजय शिंदे,** उपायुक्त

**भाईंदर :** मीरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांवर लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर अनधिकृतपणे नेटवर्क बूस्टर लावण्यात आले असल्याची बाब समोर आली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे हे नेटवर्क बूस्टर मोबाइल मनोऱ्याला पर्याय म्हणून लावण्यात आलेले असून यात पालिकेचीच दिशाभूल करण्यात आल्यामुळे कारवाई करण्याची प्रक्रिया राबवली जात आहे.

मीरा भाईंदर शहरात रस्त्यांवरील ४४ खांबांवर नेटवर्क बूस्टर उभारण्यात आले आहे. यात ज्या कंपनीने हे बूस्टर लावले आहेत, त्यांनीच काही ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची उभारणी केली आहे. शहरात सीसीटीव्ही कॅमेरे आणि नेटवर्क बूस्टर उभारण्यापूर्वी संबंधित कंपनीला पालिकेने संपूर्ण प्रकल्प अहवाल आणि त्यास होणाऱ्या फायद्याचे मुद्दे पत्राद्वारे सांगण्यास सांगितले होते. मात्र पालिकेच्या याच पत्राचा गैरवापर करत कंपनीने पोलीस विभागाकडून परस्पर परवानगी घेत सीसीटीव्ही कॅमेऱ्याची उभारणी करून त्यावर नेटवर्क बूस्टरची उभारणी केली आहे.

यापूर्वीदेखील शहरात ७१७ मोबाइल मनोरे उभारण्यात आले आहेत. अशा मनोऱ्यांची थकबाकी अजून वसूल झालेली नाही. त्यामुळे आता नेटवर्क बूस्टरचेदेखील शहरात जाळे पसरून पालिकेचे नुकसान होऊ नये म्हणून पालिकेने कारवाईची तयारी केली आहे. यात पालिका सर्वप्रथम अदानी वीज समूहाला पत्र पाठवून या नेटवर्क बूस्टरसाठी देण्यात आलेली वीज खंडित करण्याची मागणी करणार आहे. याशिवाय पालिकेच्या आवश्यक परवानग्या न घेता नेटवर्कची उभारणी केल्यामुळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला जाणार असल्याची माहिती पालिकेचे उपायुक्त संजय शिंदे यांनी दिली.

लोकसत्ता पा. नं. ३

# बेकायदा बाजार जमीनदोस्त

## शनिवारी लागलेल्या आगीनंतर वसई-विरार महापालिकेची कारवाई

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** नालासोपारा पूर्वेकडील रेल्वे स्थानकालगत असलेल्या अनधिकृत जाधव मार्केटवर सोमवारी पालिकेने कारवाई केली. या कारवाईत मार्केटमधील १८ हून अधिक अनधिकृत दुकाने जमीनदोस्त करण्यात आली. शनिवारी या मार्केटला लागलेल्या आगीत पाच दुकाने जळाली होती.



बेकायदा बाजाराला लागलेल्या आगीत साहित्य खाक झाले.

नालासोपारा पूर्वेच्या रेल्वे स्थानकाला लागूनच जाधव नावाचे मार्केट आहे. हे मार्केट पूर्णपणे अनधिकृत असून त्यात लहान लहान गाळे काढून दुकाने भाड्यावर देण्यात आली आहेत. रेल्वे स्थानकाचा परिसर गर्दीचा असून त्यात हे मार्केट उभे राहिले आहे. मार्केटच्या शेजारी शाळा आहे. रेल्वे स्थानकातून बाहेर पडण्यासाठी येथूनच रस्ता आहे. मार्केटमध्ये येणारे ग्राहक, रेल्वे स्थानकातून बाहेर पडणारे लोक यामुळे या परिसरात मोठी गर्दी होत असते. या परिसरात आग लागण्याची शक्यता आधीच वर्तविण्यात आली होती. शनिवारी संध्याकाळी एका दुकानात शॉर्टसर्किटमुळे आग लागली होती. परंतु अग्निशमन दलाने वेळीच आग विझवल्याने पुढील अनर्थ टळला होता. त्यामुळे सोमवारी हे मार्केट जमीनदोस्त करण्याचा निर्णय आयुक्त अनिलकुमार पवार यांनी घेतला होता.

अतिरिक्त आयुक्त आशीष पाटील आणि उपायुक्त अजित मुठे (अनधिकृत बांधकाम) यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली. हे मार्केट प्रभाग समिती ई आणि डच्या सीमेवर आहे. त्यामुळे दोन्ही प्रभागांचे साहाय्यक आयुक्त मनोज वनमाळी आणि विशाखा मोटघरे कारवाईच्या वेळी उपस्थित होते. या वेळी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या कारवाईत मार्केटमधील १८ हून अधिक दुकाने पूर्णपणे तोडण्यात आली, अशी माहिती उपायुक्त अजित मुठे यांनी दिली. या मार्केटवर प्रथमच अशा प्रकारची कारवाई करण्यात आली.

लोकसत्ता पा.नं. १

## पाणी समजून कीटकनाशक प्यायल्याने २ सफाई कामगारांचा मृत्यू

**विरार :** विरारमध्ये वसई विरार महापालिकेच्या फवारणी विभागात काम करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांचा वेगवेगळ्या ठिकाणी पाणी समजून कीटकनाशक प्यायल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे.

वसई-विरार महापालिकेच्या फवारणी विभागाच्या ठेक्यात मागील २० वर्षांपासून काम करणारा कर्मचारी रवींद्र किणी (५१) याने विरार पूर्व येथील मनवेलपाडा पाम गृह येथील गोदामात मागील आठवड्यात जेवणाच्या समयी त्याने चुकून पाणी समजून कीटकनाशक प्याले. कर्मचाऱ्यांनी त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. तीन ते चार दिवसांच्या उपचारानंतर त्याचा मृत्यू झाला.

तर पेल्हारमधील कर्मचारी जयमीन कमलाकर पाटील हासुद्धा पालिकेचा जुना कर्मचारी आहे. पेल्हार विभागात काम करत असताना तो एका ठिकाणी विश्रांतीसाठी थांबला असताना त्याने तहान लागली म्हणून पाणी पिण्यासाठी बॉटल काढली पण त्याने चुकून पाण्याऐवजी कीटकनाशकाची बाटली काढली आणि पाणी समजून प्याला. त्याला तातडीने उपचारासाठी महापालिका रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र उपचाराच्या दरम्यान त्याचा मृत्यू झाला. सदर दोनही घटनेतील कर्मचारी हे पालिकेचे जुने कर्मचारी असून त्यांना त्यांच्या कामाचा चांगला अनुभव आहे. यामुळे नवीन आलेल्या ठेकेदाराने फवारणीसाठी आणलेले औषध कोणत्या बाटलीत साठवले जाते असा प्रश्न निर्माण झाला आहे.

महाराष्ट्र टाइम्स पा. न. १

## 'हरकती दाखल'ची सुविधा शहरात हवी

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**



मिरा-भाईंदर शहराच्या नुकत्याच प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप विकास आराखड्यावर दिलेल्या मुदतीत ठाणे येथील सहाय्यक संचालक यांच्याकडे हरकती व सूचना दाखल करण्यास सांगण्यात आले आहे. परिणामी, नागरिकांची गैरसोय होणार असल्याने हरकती व सूचना दाखल करण्याची व्यवस्था शहरातच करण्यात यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

मिरा-भाईंदर पालिकेच्या विकास आराखड्याची मागील पाच वर्षांपासून नवीन विकास आराखड्याची प्रतीक्षा होती. नुकताच ठाणे सहाय्यक संचालक यांच्याकडून प्रारूप विकास आराखडा प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यावर काही हरकती व सूचना असल्यास ३० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. या हरकती ठाणे येथील सहाय्यक संचालक यांच्या कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे. आराखड्यात सद्यस्थितीत इमारती असणाऱ्या जागेतही रस्ता दर्शवण्यात आला आहे. धार्मिक स्थळे, विहीर, तलाव, पालिका कार्यालय इत्यादी बाबीही दर्शवण्यात आलेल्या नाहीत. इमारतींच्या काही जमिनीवर आरक्षणे टाकण्यात आली आहेत. यांसारखे अनेक प्रश्न असल्याने अनेकांना हरकती दाखल करण्यासाठी ठाण्याला जावे लागणार आहे. ऑनलाइन पद्धतीने हरकती दाखल करण्याची सुविधाही देण्यात आलेली नाही. परिणामी, नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागणार आहे. या पार्श्वभूमीवर मिरा-भाईंदर पालिका मुख्यालयातच ठाणे सहाय्यक संचालक विभागाने तात्पुरत्या स्वरूपात एक कार्यालय घेऊन या ठिकाणी हरकती व सूचना घेण्यासाठी व्यवस्था करावी. तसेच, काही प्रश्न पालिकेच्याही निदर्शनास यावे, यासाठी मनपा आयुक्तांनीही हरकती व सूचना नोंदवून घ्याव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

लोकसत्ता पा. नं. ३

# उड्डाणपुलाखालील तयार उद्यान कुलुपबंद

## महानगरपालिकेला परवानगी देण्यास टाळाटाळ

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर** :-काशिमीरा येथील उड्डाणपुलाखाली असलेल्या मोकळ्या परिसरात पालिकेकडून उद्यानाची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे उद्यान नागरिकांसाठी खुले करण्यापूर्वी पालिकेने राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (एनएचआय) विभागाकडे परवानगी मागितली आहे, मात्र संबंधित विभागाने अदयापही परवानगी दिली नाही.

काशिमीरा उड्डाणपुलाखाली असणाऱ्या मोकळ्या जागेत झोपड्या उभारण्यात आल्या होत्या. यासह अनेक खासगी वाहनेदेखील उभी केली जात होती. परिणामी, पुलाखालचा भाग कचऱ्यांच्या दुर्गंधीमुळे बकाल झाला होता. हा शहरात प्रवेश करणारा मुख्य मार्ग असल्याने त्याचे सुशोभीकरण करत उद्यान विकसित करण्याचा निर्णय मीरा-भाईंदर पालिका प्रशासनाकडून



घेण्यात आला. त्यानुसार वर्षभरापूर्वीच येथे उद्यान विकसित करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच उड्डाणपुलाची रंगरंगोटीदेखील स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत करण्यात आली आहे. या उद्यानाच्या विकासावर सुमारे ७ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. पालिकेला हे उद्यान विकसित करण्याची परवानगी देताना ते नागरिकांसाठी नसावे, या अटीवर देण्यात आले होते. मात्र आता हे उद्यान नागरिकांसाठी खुले करण्यात यावे, अशी मागणी मागच्या अनेक महिन्यांपासून स्थानिक रहिवाशांकडून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पालिकेने राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणकडे परवानगीसाठी अर्ज केला आहे.

महाराष्ट्र टाईम्स पा. नं. १

# हार्दिक पाटीलचे नवीन साहसी विक्रम

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

विरारमध्ये राहणारे आयर्नमॅन हार्दिक पाटील यांनी १७वी 'कॅलिफोर्निया आयर्नमॅन स्पर्धा' यशस्वीरित्या नुकतीच पार केली आहे. विशेष म्हणजे मागील आठवड्यामध्येच नेदरलँड देशातील ॲमस्टरडॅम येथे पार पडलेली 'टीसीएस पूर्ण मॅरेथॉन स्पर्धा'ही पाटील यांनी तब्बल नवव्यांदा पूर्ण केली आहे. या दोन्ही स्पर्धांमध्ये आयर्नमॅन हार्दिक पाटील यांनी चमकदार कामगिरी केली आहे.

हार्दिक पाटील याने सर्वप्रथम ज्युनिअर महाराष्ट्र श्री व सीनिअर श्री यामध्ये प्रथम क्रमांक मिळवून नाव कमावले. त्यानंतर २०१५ मध्ये पहिल्यांदाच पूर्ण आयर्नमॅनचा किताब पटकावून हार्दिकने घोडदौड सुरू केली होती. त्यानंतर त्याने चार वेळा 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' तसेच, चार वेळा 'वर्ल्ड रेकॉर्ड इंडिया' आणि तीन वेळा 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये विक्रमांच्या नोंदी केल्या आहेत. हार्दिकने आजवर शिकागो, न्यूयॉर्क, टोकियो, बोस्टन, लंडन, न्यूझीलँड, मेक्सिको, डेन्मार्क, तैवान, अमेरिका, ऑस्ट्रेलिया या देशात जाऊन आयर्नमॅन स्पर्धा पूर्ण केल्या आहेत. फुल आयर्नमॅन ही वर्ल्ड ट्रायथलॉन कॉर्पोरेशनद्वारे आयोजित ट्रायथलॉन स्पर्धा आहे. यात ४ किमी पोहणे, १८०.२ किमी सायकल चालवणे आणि ४२.२ किमी धावणे यांचा समावेश असतो. या तिन्ही शर्यती क्रमाने आणि खंड न घेता पूर्ण करावयाच्या असतात.

### आयर्नमॅनसह ॲमस्टरडॅम येथे मॅरेथॉन पूर्ण

